# जिल्हा परिषद नागपूर
# शिक्षण विभाग(प्राथमिक),

**जा. क्रमांक/जिपना/शिविप्रा//स्था-3/जि.प.सेस/प्र.क्र.54-23/10660/2023 दिनांक :- 30/11/2023**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांतील सेवानिवृत्त शिक्षकामधुन कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा परिषद,शाळातील रिक्त शिक्षकीय पदे भरण्याबाबत.

## जाहीर सुचना

मा. उपसचिव महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे पत्र क्रमांक : संकिर्ण -२०२३/ प्र.क्र.३६२ /टिएनटी -१दिनांक - ०७ जुलै,२०२३ अन्वये जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांची पदे मोठया प्रमाणात रिक्त असुन त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याने पवित्र प्रणालीमार्फत नियमित शिक्षक भरतीमधुन शिक्षक उपलब्ध होईपर्यत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांतील सेवानिवृत्त शिक्षकामधुन कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा परिषद शाळातील रिक्त शिक्षकीय पदे खालील तरतुदीप्रमाणे भरण्याबाबत कळविलेले आहे.

सदर पत्राचे अनुषंगाने स्वराज्य संस्थांच्या शाळांतील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांतील सेवानिवृत्त पात्र व इच्छुक शिक्षकांकडून कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा परिषद,शाळातील रिक्त शिक्षकीय पदे खालील तरतुदीप्रमाणे भरण्याबाबत आवेदनपत्र / अर्ज मागविण्यात येत आहेत.

१) सदर नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्ष राहील.

२) मानधन रु. २०,०००/- प्रतीमाह (कोणत्याही इतर लाभाव्यतिरिक्त)

३) जिल्हा परिषदेच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याशी करारनामा स्वाक्षरीत करणे आवश्यक राहील.

४) बंधपत्र / हमीपत्र: नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने शिक्षकीय पदाचे विहीत काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील. करार पद्धतीने नियुक्ती देतांना शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी शर्ती मान्य असल्याबाबतचा तसेच करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, असे बंधपत्र / हमीपत्र: दयावे लागेल.

५) नागपूर जिल्हयाअंतर्गत असलेल्या जिल्हा परिषदेच्या कोणत्याही तालुक्यातील संबंधित शाळेतील रिक्त शिक्षकीय पदाची गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे अत्यावश्यक असलेल्या शाळेतील रिक्त शिक्षकीय पदावर नियुक्ती देण्यात येईल.

६) नियुक्ती दिलेल्या शाळेत जाण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता किंवा ईतर भत्ते देय असणार नाही. नियुक्ती दिलेल्या शाळेत विद्यार्थ्यांचे अध्यापन कार्याकरीता जाणे बंधनकारक असेल.

७) वरिलप्रमाणे करण्यात आलेली नियुक्ती नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यत किंवा या कार्यालयामार्फत ठरवून दिलेल्या कालावधी पर्यत असेल.

८) जाहीर सुचना व आवेदन पत्राचा / अर्जाचा नमुना www.nagpurzp.com या संकेतस्थळावर तसेच शिक्षण विभाग(प्राथमिक), जि.प.नागपूर कार्यालयाचे सुचना फलकावर व तालुका स्तरावरील गट शिक्षणाधिकारी कार्यालयाचे सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

९) पात्र व इच्छुक सेवानिवृत्त शिक्षकांनी त्यांचे आवेदन पत्र / अर्ज सर्व आवश्यक दस्तावेजासह **शिक्षण विभाग (प्राथमिक) ,जिल्हा परिषद,नागपूर यांचे कार्यालय,** जुने सचिवालयाचे मागे, रवीभवनचे समोर, सिव्हील लाईन्स,नागपूर ४४० ००१ येथे कार्यालयीन वेळेत **दिनांक ०६.१२.२०२३ पर्यत सादर करावेत.**

१०) आवेदन पत्र / अर्ज सादर करण्याचा शेवटचा **दिनांक :- ०६.१२.२०२३ पर्यत राहील. सदर दिनांकानंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत किंवा प्राप्त अर्जाचा विचार करण्यारत येणार नाही.**

११) उमेदवारांची निवड सेवाजेष्ठतेप्रमाणे ( सेवानिवृत्तीच्या दिनांकाच्या जेष्ठतेनुसार) करण्यात येईल.

१२) अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची जेष्ठता यादी या कार्यालयाचे सुचना फलकावर दिनांक - ०७.१२.२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वा. पर्यत संबंधित उमेदवारांचे आक्षेप स्विकारण्यात येतील. आक्षेप निकाली काढून नियुक्ती करीता निवड केलेल्या उमेदवारांची यादी दिनांक - ०८.१२.२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| ( रोहिणी कुंभार ) | (सौम्या शर्मा, भा.प्र.से.) |
| शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| जिल्हा परिषद,नागपूर | जिल्हा परिषद,नागपूर |